ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयांचे आधुनिकीकरण व ई-ग्रंथालयांमध्ये रुपांतरीत करणे योजनेसाठी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र : मराग्रं २५१७/प्र.क्र.१२१/२०१७/साशि ५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ ऑक्टोबर, २०१७

वाचा :- १) शासन निर्णय़, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र : मराग्र २५१७/प्र.क्र.९०/२०१६/साशि ५, दि. ८ मार्च, २०१७.
२) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र. ५२/निधी वि.१७-१८/२०१७-१८/६१७९-८०, दि. २४/०८/२०१६.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थस-२०१७/ प्र.क्र. ९४/ अर्थस-३ दि. ३०/०६/२०१७
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. पुरक-२०१७/ प्र.क्र.१२९/ अर्थ-३ दि. १८/०८/२०१७

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधीमंडळाचे सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये मा.मंत्री, वित्त, नियोजन व वने यांनी आजच्या संगणक युगाचे सामर्थ्य ओळखून राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ई - ग्रंथालयामध्ये रुपांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या योजनेस दि.०८/०३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजना टप्प्याटप्प्याने राबविण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ६ शासकीय विभागीय ग्रंथालये आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय, दापोली तसेच राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई अशा एकूण ८ कार्यालयांचे आधुनिकीकरण व ई - ग्रंथालयांमध्ये रुपांतरीत करण्यासाठी प्रत्येक कार्यालयास रुपये ४०,००,००० /- (अक्षरी रु. चाळीस लाख फक्त) या प्रमाणे ८ कार्यालयासाठी येणारा रुपये ३,२०,००,००० /- (अक्षरी रुपये तीन कोटी वीस लाख फक्त) खर्च मंजूर निधीतून करावयाची बाब जुलै-२०१७ च्या पावसाळी अधिवेशनात लाक्षणिक पुरवणी मागणीद्वारे विधानमंडळाच्या निदर्शनास आणण्यात आली आहे. सदर मंजूर निधीच्या ७० % निधी म्हणजे रु. २,२४,००,०००/- (अक्षरी रु दोन कोटी चोवीस लाख फक्त) निधी वित्त विभागाच्या दि. ३०/०६/२०१७ च्या व दि. १८/०८/२०१७ च्या परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात ग्रंथालय संचालक यांना वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयांचे आधुनिकीकरण व ई -ग्रंथालयांमध्ये रुपांतरीत करणे या योजनेस संदर्भ क्र. १ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजना टप्प्याटप्प्याने राबविण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ६ शासकीय विभागीय ग्रंथालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय, दापोली आणि राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई अशा एकूण ८ कार्यालयांचे आधुनिकीकरण व ई ग्रंथालयांमध्ये रुपांतरीत करण्यासाठी रु. २,२४,००,०००/- (अक्षरी रु दोन कोटी चोवीस लाख फक्त) इतका निधी ग्रथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई यांना वितरीत व खर्च करण्यास शासनाची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेसाठी मंजूर करण्यात आलेला खर्च करण्यासाठी ग्रंथालय संचालक यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. प्रत्यक्ष निधी खर्च करताना वाचा येथे नमुद करण्यात आलेल्या या विभागाच्या दि. ८ मार्च,२०१७ च्या शासन निर्णयातील व वित्त विभागाच्या दि. ३०/०६/२०१७ व दि.१८/०८/२०१७ परिपत्रकातील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे. तसेच खरेदी बाबत शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्र.भाखस-२०१४ प्र.क्र.८२ / भाग-III / उद्योग- ४ दि. ०१/१२/२०१६ अन्वये मान्यता दिलेल्या नियमपुस्तीकेतील कार्यपद्धतीनुसार तसेच वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रकानुसार दिलेल्या निर्देशानुसार करण्यात यावी. प्रत्यक्ष प्रकल्पाची अंमलबजावणी करीत असताना विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अभिप्राय घेवून कार्यवाही करणे आवश्यक राहील त्याबाबत खात्री करुन प्रमाणित करण्याची जबबादारी आहरण व संवितरण अधिकरी यांची राहील. योजनेवरील खर्च हा मंजूर निधीच्या मर्यादेत करण्यात यावा.

४. या योजनेंतर्गत ६ शासकीय विभागीय ग्रंथालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय, दापोली याच्या कार्यालयासाठी येणारा खर्च हा मागणी क्र. डब्ल्यू, ४, २२०५, कला व संस्कृती,१०५, सार्वजनिक ग्रंथालये, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०३) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (०३) (०८) ग्रंथालय संचालनालय आणि सहाय्यक ग्रंथालय संचालक यांच्या कार्यालयांचे संगणकीकरण (२२०५ ३०५४) १७, संगणक खर्च, २१, सामग्री व पुरवठा, ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर),५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये मंजूर निधीतून भागविण्यात यावा.

५. तसेच या योजनेंतर्गत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई या कार्यालयासाठी येणारा खर्च हा मागणी क्र. डब्ल्यू - ४, २२०५, कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०३) (०९), राज्य मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये संगणकीकृत ग्रंथालय सेवा (२२०५ ३०६३) १७, संगणक खर्च ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्ष खाली सन २०१७-१८ मध्ये मंजूर निधीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ ८९२/१७/व्यय ५, दि.१४/०९/२०१७ च्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२७१६२७५४४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2017.10.27 16:18:40 +05'30'

(अनिल वि. सावरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा. वित्त मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
५.मा. राज्यमंत्री, (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
६. मा. मुख्य सचिव यांचे स्वीयसहाय्य, मंत्रालय मुंबई
७. अपरमुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीयसहाय्य, मंत्रालय मुंबई

८. महासंचालक माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय मुंबई (व्यापक प्रसिध्दीसाठी)
९. महालेखापाल,(लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र मुंबई/ नागपूर
१०. नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई
१२. सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक / सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी (ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)
१३. निवड नस्ती, साशि ५.